SAMPLE CONTENT

# SMART NOTES

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या प्रश्नपत्रिका आराखड्यावर आधारित

## इयत्ता बारावी

# अर्थशास्त्र




Target Publications® Pvt. Ltd.

# SMART NOTES

# अर्थशास्त्र

## इयत्ता बारावी

(महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांच्याद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या व २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यात आलेल्या अद्ययावत पाठ्यपुस्तकावर आधारित.)

**ठळक वैशिष्ट्ये**

- नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित.
- प्रश्नोत्तरांच्या स्वरूपामध्ये पाठांचा परिपूर्ण आढावा.
- परीक्षेच्या दृष्टीने उत्तरांची सुयोग्य मांडणी.
- मुद्दे लक्षात ठेवण्यासाठी 'झटपट उजळणी' समाविष्ट.
- 'ज्ञानात भर' या शीर्षकांतर्गत संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण.
- संकल्पनांना वास्तविकतेची जोड देणारा 'ज्ञानगुरू' समाविष्ट.
- विषयासंदर्भात अधिक माहिती देणारे Q. R. Codes उपलब्ध.
- दैनंदिन जीवनातील उदाहरणांचा समावेश.
- उत्तरे लक्षात राहण्याकरता महत्त्वपूर्ण शब्द ठळक स्वरूपात.
- मार्च २०२० पर्यंतच्या बोर्डाच्या परीक्षांचे प्रश्न उत्तरांसहित समाविष्ट.
- प्रत्येक पाठाच्या शेवटी स्वयंमूल्यमापनाकरता 'सराव चाचणी' (उत्तरे Q. R. Code मार्फत) समाविष्ट.
- बोर्डाची प्रश्नपत्रिका Q. R. Code मार्फत उपलब्ध.

Sample Content

Printed at: **India Printing Works,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 **TEID: 1993** P.O. No. 1997

## प्रस्तावना

टार्गेट प्रकाशनाचे **Smart Notes अर्थशास्त्र इयत्ता बारावी** हे पुस्तक विद्यार्थ्यांचे या विषयाचे आकलन व ज्ञान समृद्ध करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे. या पुस्तकाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांना संकल्पना अधिक स्पष्टपणे समजतील व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

या पुस्तकात पाठ्यपुस्तकातील सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेतच. सोबतच पाठांचा संपूर्ण आढावा घेण्याच्या दृष्टीने काही अधिकच्या प्रश्नांचाही यात समावेश करण्यात आला आहे. सर्व प्रश्नांची उत्तरे ही सविस्तर, मुद्देसूद व परीक्षेच्या दृष्टीने आदर्श उत्तरे आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेला सामोरे जाणे सोपे जाईल.

दीर्घ व अवघड उत्तरे सहज लक्षात राहावीत म्हणून आवश्यक तेथे 'झटपट उजळणी' देण्यात आली आहे. शक्य तेथे महत्त्वाचे शब्द ठळक करून देण्यात आले आहेत. ज्यामुळे, उत्तर लक्षात ठेवणे सोपे जाईल. संकल्पनांचे आकलन उत्तमरीतीने व्हावे याकरता आवश्यक तेथे 'ज्ञानात भर' या शीर्षकाखाली मुद्द्याचे अधिक स्पष्टीकरण देण्यात आले आहे. तसेच, संकल्पनांना वास्तविकतेची जोड देणारा 'ज्ञानगुरू' रंजक व व्यावहारिक माहिती देण्यासाठी तुम्हांला पुस्तकात ठिकठिकाणी भेटेल. काही मुद्द्यांसंदर्भात अधिकची माहिती देण्यासाठी या पुस्तकात अनेक ठिकाणी Q. R. Codes समाविष्ट करण्यात आले आहेत. स्वयंमूल्यमापनासाठी प्रत्येक पाठाच्या शेवटी 'सराव चाचणी' देण्यात आली आहे. या सराव चाचणीची उत्तरे Q. R. Codes मार्फत उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांचे विषयाचे ज्ञान सखोल व परिपूर्ण करणारी या पुस्तकाची अनोखी रचना विद्यार्थी, पालक व शिक्षक सर्वांच्याच पसंतीस उतरेल असा आम्हांला विश्वास वाटतो.

हे पुस्तक परिपूर्ण होण्याकरता आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता.

इ-मेल आयडी: mail@targetpublications.org

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook 'अर्थशास्त्र; प्रथमावृत्ती: २०२०' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

## ‘अर्थशास्त्र’ हा विषय का शिकावा?

परीक्षेत उत्तम गुण मिळवण्यासोबतच हा विषय शिकण्याचे इतरही अनेक फायदे आहेत.

१. अर्थशास्त्र या विषयाचा तुम्ही दैनंदिन जीवनातही अनेक वेळा अनुभव घेता. या विषयाच्या अभ्यासामुळे तुम्हांला तुमच्या अनेक अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे मिळतील. त्याचबरोबर, आपल्या अवतीभवतीच्या जगाविषयी तुम्ही अधिक सजग व्हाल.

२. हा विषय तुम्हांला मानवाचे आर्थिक वर्तन अधिक व्यवस्थित समजून घेण्यात मदत करतो. एखादी व्यक्ती एखाद्या विशिष्ट आर्थिक स्थितीमध्ये एक विशिष्ट प्रतिक्रिया का देते, ह्याचे स्पष्टीकरण विविध अर्थशास्त्रीय सिद्धान्तांतून मिळते.

३. आपण बचत का करतो, एखाद्या वस्तूची किंमत ही ‘क्ष’ का निश्‍चित करण्यात आली आहे, एखाद्या जागेचे भाडे इतर जागांच्या तुलनेने जास्त का आहे, व्याजदर सतत बदलत का राहतात, बँकांची आवश्यकता का आहे, दोन पर्यायी वस्तूंची किंमत साधारणतः सारखीच का असते, आर्थिक मंदी व तेजी कशामुळे येते यांसारख्या अनेक गोष्टींचे स्पष्टीकरण या विषयाच्या अभ्यासातून मिळते.

४. आपण बरेचवेळा शासनाच्या विविध धोरणांवर टीका करतो; पण शासनाची काही उद्दिष्टे, तसेच काही मर्यादाही असतात. अर्थशास्त्र आपल्याला ही बाजू समजून घेण्यात मदत करते.

तुमच्या संपूर्ण शैक्षणिक वाटचालीत अर्थशास्त्राची सोबत तुम्हांला लाभणारच आहे. इथून पुढे वाणिज्य क्षेत्रातील कोणताही अभ्यासक्रम (कोर्स) तुम्ही निवडलात, तरीही अर्थशास्त्राचा त्यात समावेश नक्कीच असेल.

## या पुस्तकातून अभ्यास कसा कराल?

या पुस्तकाचे दोन विभाग करण्यात आले आहेत:

**१) दीर्घोत्तरी प्रश्न** **२. वस्तुनिष्ठ/आकलनाधारित प्रश्न**

**दीर्घोत्तरी प्रश्न:**

येथे देण्यात आलेल्या प्रश्नांचा क्रम हा धड्याच्या ओघाशी मिळताजुळता आहे. त्यामुळे, एकदा तुम्ही ही सर्व प्रश्नोत्तरे वाचलीत, की तुमचा पाठ्यपुस्तकातील धडा पूर्ण वाचल्यासारखेच होईल. तेव्हा तुम्ही प्रथम ह्या विभागाचा अभ्यास करावा.

**वस्तुनिष्ठ/आकलनाधारित प्रश्न:**

हा विभाग दीर्घोत्तरी प्रश्न विभागानंतर येतो. यातील प्रश्न वस्तुनिष्ठ प्रश्न किंवा ज्ञानाच्या उपयोजनावर आधारित प्रश्न आहेत. दीर्घोत्तरी प्रश्नांचा अभ्यास केल्यानंतर ह्या विभागातील प्रश्नांची उत्तरे देणे तुम्हांला सहजसोपे होईल. शिवाय, तुमची तयारी तपासून पाहण्याकरता उत्तरे दिली आहेतच.

Sample Content

# वैशिष्ट्ये

**झटपट उजळणी**

काही वेळा प्रश्नांची उत्तरे खूपच मोठी व थोडी अवघड असतात. अशा वेळी संपूर्ण उत्तर लक्षात ठेवणे अवघड जाते. यासाठी संपूर्ण उत्तराचा संक्षिप्त आढावा घेणारी ‘झटपट उजळणी’ या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना उजळणी करणे सोपे जाईल.

**ज्ञानात भर**

काही संकल्पना थोड्या अवघड किंवा गोंधळात टाकणाऱ्या असतात. त्या समजण्यसाठी थोडेसे स्पष्टीकरण पुरेसे होत नाही. म्हणूनच, ‘ज्ञानात भर’ या शीर्षकांतर्गत अशा संकल्पना अधिक सुस्पष्टपणे समजावून सांगितल्या आहेत. येथे दिलेली माहिती परीक्षेत लिहिण्याची आवश्यकता नाही. ही माहिती केवळ संकल्पना चांगल्या पद्धतीने समजून घेण्याकरता आहे.

**ज्ञानगुरू**

ज्ञानगुरू नावाचा एक खास मित्र तुमच्या भेटीस घेऊन येत आहोत. हा मित्र तुम्हांला पुस्तकात ठिकठिकाणी भेटेल आणि तुम्ही शिकत असलेल्या विषयासंबंधी तुम्हांला व्यावहारिक जीवनातील उदाहरणे किंवा रंजक माहिती देईल.

**Q. R. Codes**

या विषयाचे आपल्या दैनंदिन जीवनात विविध प्रकारे उपयोजन करता येते. एखाद्या संकल्पनेशी संबंधित एखादा वर्तमानपत्रातला लेख किंवा व्हिडिओ तुम्हांला त्या संकल्पनेशी अधिक जोडून घेण्यात मदत करेल. अशी माहिती देणाऱ्या काही लिंक्स तुम्हांला Q. R. Code मार्फत दिल्या आहेत.
त्याचप्रमाणे बोर्डाची प्रश्नपत्रिकादेखील Q. R. Code मार्फत देण्यात आली आहे.

**सराव चाचणी**

प्रत्येक पाठाच्या शेवटी स्वयंमूल्यमापनासाठी सराव चाचणी देण्यात आली आहे. सराव चाचणीची उत्तरे Q. R. Codes मार्फत देण्यात आली आहेत.

Sample Content

## प्रश्नपत्रिकेचे प्रारूप

**गुण: ८०** **वेळ: ३ तास**

| प्र.क्र. | प्रश्न | प्रत्येक प्रश्नासाठी गुण | सोडवण्याच्या प्रश्नांची संख्या | विकल्पांशिवाय गुण | विकल्पांसहित गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | **पुढे दिलेल्या उपप्रश्नांच्या प्रकारांपैकी कोणतेही चार सोडवणे** | | | | |
| | अ. योग्य पर्याय निवडा. | १ | ५ | ५ | ५ |
| | ब. सहसंबंध पूर्ण करा. | १ | ५ | ५ | ५ |
| | क. आर्थिक पारिभाषिक शब्द लिहा. | १ | ५ | ५ | ५ |
| | ड. विसंगत शब्द ओळखा. | १ | ५ | ५ | ५ |
| | इ. खालील विधाने पूर्ण करा. | १ | ५ | ५ | ५ |
| | फ. चुकीची जोडी शोधा. | १ | ५ | ५ | ५ |
| | ग. विधाने व तर्क प्रश्न. | १ | ५ | ५ | ५ |
| | ह. योग्य जोडीचा पर्याय निवडा. | १ | ५ | ५ | ५ |
| | **एकूण गुण** | | **२०** | **२०** | **२०** |
| २. | अ. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा. | २ | ५ पैकी ३ | ६ | १० |
| | ब. फरक स्पष्ट करा. | २ | ५ पैकी ३ | ६ | १० |
| ३. | खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. | ४ | ५ पैकी ३ | १२ | २० |
| ४. | खालील विधानांशी आपण सहमत आहात, की नाही ते स्पष्ट करा. | ४ | ५ पैकी ३ | १२ | २० |
| ५. | खालील तक्ता, आकृती, उतारा अभ्यासून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. | ४ | ३ पैकी २ | ०८ | १२ |
| ६. | सविस्तर उत्तरे लिहा. | ८ | ३ पैकी २ | १६ | २४ |
| | **एकूण गुण** | | | **८०** | **११६** |

### गुणांचे प्रश्नांनुसार विभाजन

| अनु. क्र. | प्रश्नप्रकार | गुण | विकल्पांसहित गुण | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | वस्तुनिष्ठ | २० | २० | २५% |
| २ | अतिलघुत्तरी | १२ | २० | १५% |
| ३ | लघुत्तरी | ३२ | ५२ | ४०% |
| ४ | दीर्घोत्तरी | १६ | २४ | २०% |
| | **एकूण गुण** | **८०** | **११६** | **१००%** |

Sample Content

## पुस्तकात देण्यात आलेले विविध प्रश्नप्रकार

या पुस्तकात तुम्ही पुढील प्रकारांतील प्रश्नांचा अभ्यास करणार आहात.

| अनु.क्र. | प्रश्नप्रकार | पाठ १ | पाठ २ | पाठ ३ अ | पाठ ३ ब | पाठ ४ | पाठ ५ | पाठ ६ | पाठ ७ | पाठ ८ | पाठ ९ | पाठ १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |
| | **दीर्घोत्तरी प्रश्न** | | | | | | | | | | | |
| १. | खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २. | फरक स्पष्ट करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ३. | खालील उदाहरणे सोडवा. | NA | NA | NA | NA | NA | NA | ✓ | NA | NA | NA | NA |
| | **वस्तुनिष्ठ प्रश्न** | | | | | | | | | | | |
| अ. | योग्य पर्याय निवडा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ब. | विधाने आणि तर्क विधाने – खालीलपैकी योग्य उत्तर निवडा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| क. | योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ड. | योग्य जोडीचा पर्याय निवडा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✗ | ✓ | ✓ | ✓ | ✗ |
| इ. | सहसंबंध पूर्ण करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| फ. | गटात न बसणारा शब्द ओळखा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ग. | दिलेल्या विधानांसाठी योग्य अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सुचवा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | खालील विधानांशी आपण सहमत किंवा असहमत आहात ते सकारण स्पष्ट करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | पुढील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✗ | ✓ | ✗ | ✓ | ✓ | ✓ | ✗ |
| | खालील तक्त्याचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा. | NA | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | NA | NA | NA | NA | ✓ |

**टीप:** वरील सर्व प्रश्नप्रकार पाठ्यपुस्तकात समाविष्ट आहेत.

Sample Content

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | पाठाचे नाव | एकूण गुण | विकल्पांसहित गुण | पृष्ठ क्र. (दीर्घोत्तरी प्रश्न) | पृष्ठ क्र. (वस्तुनिष्ठ प्रश्न) |
|---|---|---|---|---|---|
| १. | सूक्ष्म आणि स्थूल अर्थशास्त्राचा परिचय | ०७ | १० | १ - १० | १४५ - १५२ |
| २. | उपयोगिता विश्लेषण | ०७ | १० | ११ - २४ | १५३ - १६१ |
| ३. अ. | मागणीचे विश्लेषण | ०८ | १२ | २५ - ३८ | १६२ - १७२ |
| ३. ब. | मागणीची लवचीकता | ०८ | १२ | ३९ - ५५ | १७३ - १८२ |
| ४. | पुरवठा विश्लेषण | ०७ | १० | ५६ - ७१ | १८३ - १९२ |
| ५. | बाजाराचे प्रकार | ०७ | १० | ७२ - ८२ | १९३ - २०१ |
| ६. | निर्देशांक | ०८ | ११ | ८३ - ९५ | २०२ - २०७ |
| ७. | राष्ट्रीय उत्पन्न | ०८ | १२ | ९६ - ११० | २०८ - २१८ |
| ८. | भारतातील सार्वजनिक वित्त व्यवहार | ०८ | १२ | १११ - १२२ | २१९ - २२९ |
| ९. | भारतातील नाणे बाजार आणि भांडवल बाजार | ०८ | ११ | १२३ - १३६ | २३० - २४० |
| १०. | भारताचा विदेशी व्यापार | ०४ | ०६ | १३७ - १४४ | २४१ - २४७ |
| | **एकूण गुण** | ८० | ११६ | | |
| • | **बोर्डाची प्रश्नपत्रिका पाहण्याकरता शेजारील Q. R. Code स्कॅन करावा.** | | | | |


**टीप:** i. पाठाखाली दिलेले प्रश्न **(T)** चा चिन्हाने दर्शवले आहेत.

ii. प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला अनुक्रमणिका देण्यात आली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना पाठाचा आढावा घेता येईल. बोर्डाच्या परीक्षांमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांपुढे शक्य तेथे त्या परीक्षेचे वर्ष नमूद करण्यात आले आहे.

Sample Content

Sample Content

# १० भारताचा विदेशी व्यापार

| अनु.क्र. | तपशील | बोर्ड परीक्षा |
|---|---|---|
| १. | विदेशी व्यापाराची संकल्पना स्पष्ट करून प्रकार स्पष्ट करा. **(T)** | |
| २. | विदेशी व्यापार म्हणजे काय सांगून विदेशी व्यापाराची भूमिका स्पष्ट करा. **(T)** | |
| ३. | भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा. **(T)** | |
| ४. | भारतीय विदेशी व्यापाराची दिशा सांगा. | |
| ५. | भारताच्या निर्यातीतील अद्ययावत कल स्पष्ट करा. **(T)** | |
| ६. | भारताच्या आयात कलाचे मुद्दे स्पष्ट करा. **(T)** | |
| ७. | २००१ पासूनचा भारताच्या विदेशी व्यापाराचा कल स्पष्ट करा. | |
| ८. | व्यवहारतोल संकल्पना स्पष्ट करा. | |
| ९. | व्यापारतोल म्हणजे काय? | |
| १०. | फरक स्पष्ट करा. | |
| ११. | सराव चाचणी. | |

**प्रस्तावना**

व्यापारी क्रियाकलाप हे कोणत्याही अर्थव्यवस्थेचा आधार आहेत. जागतिकीकरणामुळे राष्ट्रीय सीमांपलीकडे व्यापारात वेगाने विस्तार होत आहे. इतर सर्व देशांप्रमाणे भारत देशही बऱ्याच देशांशी व्यापारी संबंध ठेवतो. अशा व्यापारामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीस हातभार लागतो. या पाठात आपण विदेशी व्यापार ही संकल्पना तपशीलवार समजून घेणार आहोत.

- **स्वातंत्र्यपूर्व काळ**

  १) स्वातंत्र्यपूर्वकाळात भारताचा विदेशी व्यापार हा वसाहतवादी होता.

  २) भारत औद्योगिक राष्ट्रांना-विशेषत: इंग्लंडला कच्च्यामालाची निर्यात करत असे आणि तेथून कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तूंची आयात करत असे.

  ३) अशाप्रकारे, परकीय व्यापारावर अवलंबून असल्यामुळे भारतात औद्योगिकीकरण होऊ शकले नाही.

  ४) त्यामुळेच, भारतातील स्वदेशी उद्योगांचा ऱ्हास झाला.

  ५) परंतु, दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक अविकसित राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळाले व त्या राष्ट्रांनी परकीय व्यापाराकडे गुंतवणूक म्हणून पाहण्यास सुरुवात केली.

- **अंतर्गत व्यापाराचा अर्थ**

  राष्ट्रांच्या भौगोलिक सीमांच्या अंतर्गत केली जाणारी वस्तू व सेवांची खरेदी-विक्री म्हणजे अंतर्गत किंवा देशांतर्गत किंवा गृह व्यापार होय. **उदा.** महाराष्ट्र राज्यात उत्पादित होणाऱ्या वस्तूंची विक्री उत्तर प्रदेश, तामिळनाडू, पश्चिम बंगाल या वेगवेगळ्या राज्यांत होत असेल, तर अशा व्यापाराला 'अंतर्गत व्यापार' म्हटले जाते.

## प्र. १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

### १. विदेशी व्यापाराची संकल्पना स्पष्ट करून प्रकार स्पष्ट करा. (T)

**उत्तर:** विदेशी व्यापार म्हणजे जगातील **विविध देशांत केला जाणारा व्यापार** होय. यालाच 'आंतरराष्ट्रीय व्यापार' किंवा 'बाह्य व्यापार' असेही म्हणतात.

प्रा. मॅक्स वॉसरमन आणि हल्टमन यांच्या मते, "विविध देशांतील रहिवाशांमध्ये चालणाऱ्या व्यवहारांचा समावेश आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये होतो." विदेशी व्यापाराचे पुढील तीन प्रकार आहेत.

Sample Content

१) **<u>आयात व्यापार</u>**

आयात व्यापार म्हणजे एका देशाने दुसऱ्या देशाकडून केलेली वस्तू व सेवांची **खरेदी** होय. दुसऱ्या शब्दांत स्वदेशाकडून परदेशातील **वस्तू व सेवांचा केला गेलेला अंत:प्रवाह** म्हणजे आयात व्यापार होय. उदा. भारत पेट्रोलियमची आयात इराक, कुवेत, सौदी अरेबिया या देशांतून करतो.

२) **<u>निर्यात व्यापार</u>**

निर्यात व्यापार म्हणजे एका देशाने दुसऱ्या देशाला केलेली वस्तू व सेवांची **विक्री** होय. दुसऱ्या शब्दांत, एका देशातून दुसऱ्या देशांत केला जाणारा **वस्तू व सेवांचा बहिर्प्रवाह** म्हणजे निर्यात व्यापार होय. **उदा.** भारत हाँगकाँग, सिंगापूर, चीन इत्यादी देशांना तांदूळ, ताग, चहासारख्या वस्तूंची निर्यात करतो.

३) **<u>पुनर्निर्यात व्यापार</u>**

पुनर्निर्यात व्यापार म्हणजे वस्तूंची **आयात करून त्यावर प्रक्रिया करून ती वस्तू निर्यात** करणे होय. उदा. जपान हा देश रेडिओ, धुलाईयंत्र, दूरदर्शन यांसारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्यामालाची इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स इत्यादी देशांतून आयात करतो व त्यावर प्रक्रिया करून जगातील विविध देशांना विकतो.



**ज्ञानगुरू**

१ एप्रिल २०१५ रोजी भारताच्या विदेशी व्यापार धोरण (FTP) २०१५-२० चे अनावरण तत्कालीन वाणिज्य व उद्योग राज्यमंत्री निर्मला सितारामन यांनी केले. हे धोरण देशातील निर्यात व रोजगाराची वाढ करण्यासोबतच देशात मूल्यवृद्धी करण्याकरता रूपरेषा पुरवते.

**टीप:** या धोरणाबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी सोबत दिलेला Q.R. Code स्कॅन करावा.

### २. विदेशी व्यापार म्हणजे काय सांगून विदेशी व्यापाराची भूमिका स्पष्ट करा. (T)

**उत्तर:** विदेशी व्यापार म्हणजे जगातील विविध देशांत केला जाणारा व्यापार होय. या व्यापाराची आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका असते. हा व्यापार आर्थिक वृद्धीची गुरुकिल्ली आहे. विकसित देशांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराचा स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP) महत्त्वपूर्ण वाटा असतो. विदेशी व्यापाराची भूमिका पुढील मुद्द्यांतून स्पष्ट होते.

१) **<u>परकीय चलन प्राप्ती</u>**

विदेशी व्यापारामुळे परकीय चलन मिळते व त्याचा वापर विविध उत्पादक कार्यांसाठी करता येतो. हा बाजार विस्तारीकरणासाठी आणि उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वाचा ठरतो.

२) **<u>गुंतवणुकीस प्रोत्साहन</u>**

विदेशी व्यापारामुळे उत्पादकांना देशांतर्गत बाजारपेठेच्या पलीकडे जाण्याची संधी उपलब्ध होते. त्यामुळे, त्यांना निर्यातीसाठी अधिक उत्पादन करण्याचे प्रोत्साहन मिळते. परिणामी, देशातील एकूण गुंतवणुकीत वाढ होते.

३) **<u>श्रमविभागणी आणि विशेषीकरण</u>**

काही देशांमध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध असते. असे देश कच्च्यामालाची निर्यात करतात व ज्यांच्याकडे मुबलक श्रमपुरवठा असतो अशा देशांतून पक्कामाल आयात करतात. त्यामुळे, जागतिक पातळीवर श्रमविभागणी आणि विशेषीकरण होते. याचा फायदा सर्व देशांना होतो.

४) **<u>संसाधनांचे पर्याप्त वाटप आणि वापर</u>**

विशेषीकरणामुळे दुर्मिळ संसाधने अशाच वस्तूंच्या उत्पादनासाठी वापरली जातात ज्यापासून महत्तम लाभ प्राप्त होतो. म्हणजेच, संसाधनांचा महत्तम उपयोग केला जातो. म्हणून, विदेशी व्यापारामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर संसाधनांचे पर्याप्त वाटप व वापर होतो.

५) **<u>किंमतपातळीतील स्थैर्य</u>**

विदेशी व्यापारामुळे मागणी व पुरवठा यांची स्थिती स्थिर राहते. त्यामुळेच, अर्थव्यवस्थेतील किंमतपातळीत स्थैर्य निर्माण होते.

Sample Content



**ज्ञानगुरू**

नोव्हेंबर २०१९ मध्ये आपल्या देशात कांद्याचा पुरवठा घटल्यामुळे किमतीत तीव्र वाढ झाली. सरकारने इजिप्त व टर्की येथून ३६००० मेट्रिक टन कांद्याची आयात केली. यामुळे, बाजारात कांद्याचा पुरवठा वाढला आणि किमती स्थिर झाल्या. (३६००० मेट्रिक टन = ३.६ कोटी किलो)

६) **बहुविध पर्यायांची उपलब्धता**

विदेशी व्यापारामुळे विदेशातून अनेक वस्तू स्थानिक बाजारात उपलब्ध होतात. त्यामुळे, उपभोक्त्यांना अनेक आयात वस्तूंच्या निवडीची संधी प्राप्त होते. विदेशी व्यापार तीव्र स्पर्धात्मक स्वरूपाचा असल्यामुळे गुणात्मक व उच्च दर्जाच्या उत्पादनाची खात्री असते. त्यामुळे, राहणीमानाचा दर्जा उंचावतो.

७) **प्रतिष्ठा व नावलौकिक**

निर्यातदार देशांना आंतरराष्ट्रीय बाजारात प्रतिष्ठा व नावलौकिक प्राप्त करणे शक्य होते. उदा. जपान, जर्मनी, स्वित्झर्लंड यांसारख्या देशांनी उच्च दर्जाच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्यात करून विदेशी बाजारात प्रतिष्ठा आणि नावलौकिक मिळवला आहे.

**३. भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.** (T)

**उत्तर:** गेल्या ७० वर्षांच्या काळात भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेत व दिशेत पूर्णतः बदल झाले आहेत. भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

१) **स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा वाढता हिस्सा**

भारताच्या निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नात विदेशी व्यापाराचा (म्हणजेच आयात-निर्यात) हिस्सा १९९०-९१ मध्ये १७.५५% होता. २००६-०७ मध्ये त्यामध्ये २५% इतकी वाढ झाली आणि २०१६-१७ मध्ये ही वाढ ४८.८% इतकी होती.

| वर्ष | निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नात विदेशी व्यापाराचा हिस्सा |
|---|---|
| १९९०-९१ | १७.५५% |
| २००६-०७ | २५% |
| २०१६-१७ | ४८.८% |

२) **व्यापाराच्या आकारमानात व मूल्यात वाढ**

भारताच्या विदेशी व्यापाराच्या आकारमानात व मूल्यात १९९०-९१ पासून लक्षणीय वाढ झाली. सध्या भारत मोठ्या प्रमाणात अधिक मूल्य (किंमत) व आकारमान (वस्तूंची संख्या) असलेल्या वस्तू व सेवांची निर्यात व आयात करतो.

३) **निर्यातीच्या रचनेत बदल**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारत कापूस, ताग, चामडे, चहा, तेलबिया, अन्नधान्य, काजू बिया, खनिज उत्पादने इत्यादी प्राथमिक उत्पादने निर्यात करत होता. भारताच्या निर्यातीत आता तयार कपडे, माणके, हिरे, इलेक्ट्रॉनिक वस्तू-विशेषत: संगणक हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर या वस्तूंनी प्रमुख स्थान मिळवले आहे.

४) **आयातीच्या रचनेत बदल**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारत कापड, वाहने, औषधे, इलेक्ट्रिकल वस्तू यांसारख्या उपभोग्य वस्तूंची आयात करत होता. आता भारत मुख्यत: पेट्रोल आणि तत्सम उत्पादने, अत्याधुनिक यंत्रसामग्री, पोलाद, रसायने, खते इत्यादी वस्तूंची आयात करतो.

५) **सागरी व्यापार**

भारताचा बहुतेक व्यापार हा सागरी मार्गाने होतो. नेपाळ, अफगाणिस्तान, म्यानमार, श्रीलंका इत्यादी आपल्या शेजारी देशांशी भारताचे चांगले व्यापारी संबंध आहेत. भारताच्या एकूण विदेशी व्यापारापैकी जवळपास ६८% व्यापार हा सागरी मार्गाने होतो.

६) **नवीन बंदरांचा विकास**

पूर्वी भारताला विदेशी व्यापारासाठी प्रामुख्याने मुंबई, कोलकाता, चेन्नई या बंदरांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे, या बंदरांवर अतिरिक्त भार पडत होता. अलीकडच्या काळात, भारताने या बंदरांवरील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी कांडला, कोचीन, विशाखापट्टणम, न्हावाशेवा इत्यादी नवीन बंदरे विकसित केली आहेत.

**टीप:** न्हावाशेवा हे बंदर जवाहरलाल नेहरू बंदर म्हणून ओळखले जाते. हे भारतातील सर्वांत मोठे बंदर आहे.

Sample Content

### ४. भारतीय विदेशी व्यापाराची दिशा सांगा.

**उत्तर:** मागील ७० वर्षांच्या काळात भारतीय विदेशी व्यापाराच्या दिशेत लक्षणीय बदल झाला आहे.

१) विदेशी व्यापाराची दिशा म्हणजे भारत आपल्या वस्तू व सेवांची **निर्यात कोणत्या देशाला करतो व कोणत्या देशातून** वस्तू व सेवा **आयात करतो.**

२) दुसऱ्या शब्दांत, विदेशी व्यापाराची दिशा निर्यातीचे अंतिम स्थान, तसेच आयातीचे प्रमुख स्रोत दर्शवते.

३) स्वातंत्र्यपूर्व काळात भारताचा **बहुतांशी व्यापार ब्रिटनशी** होत असे. परिणामी, ब्रिटनला भारताच्या विदेशी व्यापारात प्रमुख स्थान होते.

४) परंतु, स्वातंत्र्यानंतर भारताने इतर अनेक देशांशी व्यापारी संबंध प्रस्थापित केले.

५) आता **अमेरिका हा भारताचा प्रमुख व्यापारी भागीदार** असून त्यानंतर जर्मनी, जपान, युनायटेड किंगडम इत्यादी देशांशी भारताचा व्यापार होतो.

### ५. भारताच्या निर्यातीतील अद्ययावत कल स्पष्ट करा. (T)

**उत्तर:** निर्यात व्यापार म्हणजे एका देशाने दुसऱ्या देशाला केलेली वस्तू व सेवांची विक्री. दुसऱ्या शब्दांत देशातून परदेशांत जाणारा वस्तूंचा बहिर्प्रवाह म्हणजे निर्यात.

सद्यस्थितीत भारताच्या निर्यातीतील कल पुढीलप्रमाणे आहेत:

**१) अभियांत्रिकी वस्तू**

२०१७-१८ च्या अभियांत्रिकी वस्तू निर्यात प्रोत्साहन समिती (EGEPC) अहवालानुसार भारताच्या एकूण निर्यातीत अभियांत्रिकी वस्तूंचा हिस्सा २५% इतका होता. यामध्ये वाहतुकीची स्वयंचलित व स्वयंपूर्ण उपकरणे, यंत्रसामग्री व साधने यांचा मुख्यत: समावेश होतो. २०१०-११ ते २०१४-१५ या काळात वाहतुकीच्या उपकरणांची निर्यात १६ अब्ज यू.एस.डॉलर्स पासून वाढून २४.८ अब्ज डॉलर्स झाली.

**२) पेट्रोलियम उत्पादने**

२००१-०२ पासून भारताच्या तेल शुद्धीकरणाच्या क्षमतेत लक्षणीय बदल झाल्यामुळे भारत पेट्रोलियम शुद्धीकरण उत्पादनाचा निर्यातदार म्हणून गणला जाऊ लागला. २०००-०१ मध्ये भारताच्या एकूण निर्यातीत पेट्रोलियम उत्पादनांचा हिस्सा ४.३% इतका होता; त्यात २०१३-१४ मध्ये झपाट्याने म्हणजे २०.१% इतकी वाढ झाली.

**३) रसायने आणि रासायनिक उत्पादने**

गेल्या काही वर्षांत रसायने व रासायनिक उत्पादने यांची निर्यात बऱ्यापैकी वाढली आहे. २०१४-१५ मध्ये एकूण निर्यातीत त्यांचा वाटा १०.४% इतका होता.

**४) रत्ने आणि दागिने**

रत्ने आणि दागिने यांचा भारताच्या निर्यात उत्पन्नात महत्त्वाचा वाटा आहे. २०१४-१५ मध्ये एकूण निर्यातीत यांचा हिस्सा १३.३% होता.

**५) कापड आणि तयार कपडे**

भारत हा कापड व तयार कपड्यांच्या निर्यातीमध्ये संपूर्ण जगात अग्रस्थानी आहे. २०१४-१५ मध्ये भारताच्या एकूण निर्यातीत कापड आणि तयार कपड्यांचा वाटा ११.३% इतका होता.



**ज्ञानगुरू**

तिरूपूर हे तामिळनाडूमधील शहर भारताच्या तयार कपड्यांच्या निर्यातीचे केंद्र म्हणून ओळखले जाते. भारतातील सुती निटवेअरच्या निर्यातीपैकी जवळपास ९०% निर्यात येथून होते. वस्त्रोद्योग व तयार कपड्यांच्या निर्मितीत ८५०० पेक्षा जास्त कारखाने कार्यरत आहेत. २०१८-१९ मध्ये तिरूपुरातील सर्व कारखान्यांतील एकत्रित कपड्यांची एकून निर्यात २६००० कोटी होती.

### ६. भारताच्या आयात कलाचे मुद्दे स्पष्ट करा. (T)

**उत्तर:** एका देशाने दुसऱ्या देशाकडून केलेली वस्तू व सेवांची खरेदी म्हणजे आयात व्यापार होय. दुसऱ्या शब्दांत स्वदेशाकडून परदेशांतील वस्तू व सेवांचा केला गेलेला अंत:प्रवाह म्हणजे आयात व्यापार होय.

Sample Content

भारताच्या आयात कलाचे मुद्दे पुढीलप्रमाणे:

१) **पेट्रोलियम**

भारताच्या आयात व्यापारात आर्थिक सुधारणांपूर्वी व नंतरही पेट्रोलियम हा घटक महत्त्वाचा राहिलेला आहे. १९९०-९२ मध्ये एकूण आयातीत याचे प्रमाण २७% होते, तर सद्यस्थितीत ते ३१% आहे.

२) **सोने**

भारताकडून आयात केली जाणारी दुसऱ्या क्रमांकावरील वस्तू म्हणजे सोने; मात्र सोन्याची आयात २०१०-११ मधील ५३.३ अब्ज डॉलरवरून २०१३-१४ मध्ये २७.५ अब्ज डॉलरपर्यंत घटली. ही घट प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर सोन्याच्या किमतीत घट झाल्यामुळे व सरकारच्या सोने आयातीवरील कडक निर्बंधामुळे झाली.

३) **खते**

भारताच्या आयातीत खतांचे प्रमाण १९९०-९१ मध्ये ४.१% होते, ते २०१६-१७ मध्ये १.३% पर्यंत घटले.

४) **लोह व पोलाद**

यावरील आयात खर्च ४.९% वरून २.१% पर्यंत खाली आला.

**७. २००१ पासूनचा भारताच्या विदेशी व्यापाराचा कल स्पष्ट करा.**

**उत्तर:** विदेशी व्यापार म्हणजे जगातील विविध देशांत केला जाणारा व्यापार होय. यात निर्यात व्यापार व आयात व्यापार यांचा समावेश होतो. उदारीकरणापासून भारताचा विदेशी व्यापार अनेक पटींनी वाढला आहे. यामध्ये आयात आणि निर्यात घटकांमध्ये भौगोलिक क्षेत्रातही संरचनात्मक बदल घडले आहेत.

**टीप:** भारताच्या आयात आणि निर्यात व्यापाराचे कल पाहण्यासाठी प्र.क्र.१ – ५ व ६ अभ्यासा.

**झटपट उजळणी**

| घटक | व्यापारातील हिस्सा |
|---|---|
| **निर्यात** | |
| १. अभियांत्रिकी वस्तू | २०१७-१८ मध्ये एकूण निर्यातीतील हिस्सा २५% होता. २०१०-११ ते २०१४-१५ मध्ये वाहतुकीच्या उपकरणांची निर्यात १६ अब्ज यू.एस. डॉलर्सपासून २४.८ अब्ज डॉलर्स एवढी वाढली. |
| २. पेट्रोलियम उत्पादने | २०००-०१ ते २०१३-१४ पर्यंत एकूण निर्यातीतील हिस्सा ४.३% वरून २०.१% इतका वाढला. |
| ३. रसायने आणि रासायनिक उत्पादने | एकूण निर्यातीतील हिस्सा २०१४-१५ मध्ये १०.४% होता. |
| ४. रत्ने आणि दागिने | एकूण निर्यात व्यापारातील हिस्सा २०१४-१५ मध्ये १३.३% होता. |
| ५. कापड आणि तयार कपडे | एकूण निर्यात व्यापारातील हिस्सा २०१४-१५ मध्ये ११.३% होता. |
| **आयात** | |
| १. पेट्रोलियम | १९९०-९२ मध्ये एकूण आयात खर्चात याचा हिस्सा २७% होता तो आता ३१% एवढा वाढला आहे. |
| २. सोने | आयात २०११-१२ मध्ये ५३.३ अब्ज यू.एस डॉलर्स वरून २०१३-१४ मध्ये २७.५ अब्ज यू.एस.डॉलर्सपर्यंत घटली. |
| ३. खते | एकूण आयात खर्चातील हिस्सा १९९०-९१ मध्ये ४.१% वरून २०१६-१७ मध्ये १.३% एवढा कमी झाला. |
| ४. लोह व पोलाद | यावरील आयात खर्चाचे प्रमाण ४.९% वरून २.१% पर्यंत घटले. |

**८. व्यवहारतोल संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर:** १) **एका वर्षाच्या कालावधीत देशाच्या सर्व आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांची पद्धतशीरपणे केलेली नोंदणी** म्हणजे व्यवहारतोल होय.

२) प्रा.**एल्सवर्थ** यांच्या मते, "एका देशातील रहिवासी व जगातील उर्वरित रहिवासी यांच्यात केल्या गेलेल्या सर्व देण्याघेण्याचे लिखित विवरण म्हणजे व्यवहारतोल होय."

Sample Content

३) प्रा. **वॉल्टर क्रॉझ** यांच्या मते, "एखादया विशिष्ट कालावधीत (सामान्यत: एक वर्ष) एखादया देशातील नागरिकांच्या व जगातील उर्वरित नागरिकांच्या दरम्यान करण्यात आलेल्या संपूर्ण आर्थिक देण्याघेण्याचे व्यवस्थित विवरण म्हणजे व्यवहारतोल होय."

४) थोडक्यात, एक वर्षाच्या कालावधीत वेगवेगळ्या देशांतील नागरिक, व्यापारी, उदयोगसंस्था, सरकार यांच्यात वस्तू व सेवांची देवाणघेवाण केली जाते, त्याच्या मूल्यांचा समावेश व्यवहारतोलात होतो.

**ज्ञानात भर**

देशाचा व्यवहारतोल तयार करताना खालील सर्व गोष्टी विचारात घेतल्या जातात.

| देशाचे महसूल स्रोत | देशाचे खर्च |
|---|---|
| १. विदेशात वस्तू व सेवा विकल्याने (निर्यात) मिळणारे उत्पन्न. | १. आयात केलेल्या वस्तू व सेवांसाठी दयावी लागणारी रक्कम. |
| २. विदेशांकडून मिळालेले व्याज, नफा, लाभांश इत्यादी. | २. विदेशांना दिलेले व्याज, नफा, लाभांश इत्यादी. |
| ३. विदेशांकडून मिळालेल्या एकतर्फी रकमा (भेटी/अनुदाने). | ३. विदेशांना दिलेल्या एकतर्फी रकमा (भेटी/अनुदाने). |
| ४. अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन कर्जे घेणे. | ४. अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन कर्ज देणे. |

**९. व्यापारतोल म्हणजे काय?**

**उत्तर:** १) **विशिष्ट कालावधीतील देशाच्या आयात व निर्यात मूल्यांतील फरक** म्हणजे व्यापारतोल होय.

२) व्यापारतोलाला **आंतरराष्ट्रीय व्यापारतोल** असेही म्हणतात.

३) प्रा. बेनथम् यांच्या मते, "एखादया विशिष्ट काळातील, एखादया देशाच्या दृश्य व अदृश्य वस्तूंचे निर्यात मूल्य आणि आयात मूल्यांच्या संबंधांना व्यापारतोल असे म्हणतात."

४) प्रा. सॅम्युअलसन यांच्या मते, "जर व्यापार केला जाणाऱ्या वस्तूंचे निर्यात मूल्य आयात मूल्यापेक्षा जास्त असेल, तर त्याला अनुकूल व्यापारतोल असे म्हणतात. जर आयात मूल्य निर्यात मूल्यापेक्षा जास्त असेल, तर त्याला प्रतिकूल व्यापारतोल म्हणतात."

म्हणजेच, **अनुकूल व्यापारतोल = निर्यात मूल्य > आयात मूल्य, तर प्रतिकूल व्यापारतोल = आयात मूल्य > निर्यात मूल्य.**

५) वरील व्याख्यांवरून लक्षात येते, की व्यापारतोलाचा संबंध दृश्य व अदृश्य वस्तूंच्या आयात-निर्यात मूल्यांशी येतो.



**ज्ञानगुरू**

भारताचा प्रतिकूल व्यापरतोल २०१७-१८ मधील ८४.४५ अब्ज डॉलर्सवरून वाढून २०१८-१९ मध्ये १०३.६३ अब्ज डॉलर्स झाला. १०३.६३ अब्ज यू.एस.डॉलर्स म्हणजे जवळपास ₹८ लाख कोटी. तुम्हांला हे समजल्यावर आश्चर्य वाटेल, की २०१८-१९ साठी भारताचे एकूण अंदाजपत्रक अंदाजे ३८४ अब्ज यू.एस.डॉलर्स एवढे होते.

## प्र.२ फरक स्पष्ट करा.

**१. अंतगर्त व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार. (T)**

**उत्तर:**

| अंतगर्त व्यापार | आंतरराष्ट्रीय व्यापार |
|---|---|
| १) राष्ट्राच्या भौगोलिक सीमांच्या अंतर्गत केला जाणारा व्यापार म्हणजे अंतर्गत व्यापार. | १) आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे जगातील विविध देशांत केला जाणारा व्यापार होय. |
| २) याला देशांतर्गत व्यापार किंवा गृह व्यापार असेही म्हणतात. | २) याला विदेशी व्यापार किंवा बाह्य व्यापार असेही म्हणतात. |
| ३) उदा. महाराष्ट्रात उत्पादित वस्तू उत्तर प्रदेशात विकल्या जातात. | ३) उदा. भारत पेट्रोलिअमची आयात इराककडून करतो, तर सिंगापूरला चहा निर्यात करतो. |
| ४) यात विदेशी चलनाची देवाणघेवाण होत नाही. | ४) यात विदेशी चलनाची देवाणघेवाण होते. |

Sample Content

**२. विदेशी व्यापाराचा आयात कल आणि निर्यात कल. (T)**

**उत्तर:**

| निर्यात कल | | आयात कल | |
|---|---|---|---|
| १) | एका देशाने दुसऱ्या देशाला केलेली वस्तू व सेवांची विक्री किंवा स्वदेशातून परदेशात जाणारा वस्तूंचा बहिर्प्रवाह म्हणजे निर्यात होय. | १) | एका देशाने दुसऱ्या देशाकडून केलेली वस्तू व सेवांची खरेदी किंवा स्वदेशाकडून परदेशातील वस्तू व सेवांचा अंत:प्रवाह म्हणजे आयात होय. |
| २) | निर्यातीमुळे विदेशी चलनाचा अंत:प्रवाह होतो. | २) | आयातीमुळे विदेशी चलनाचा बहिर्प्रवाह होतो. |
| ३) | भारताच्या एकूण निर्यातीत अभियांत्रिकी वस्तूंचा हिस्सा सगळ्यांत जास्त (२०१७-१८ मध्ये २५%) आहे. | ३) | भारताच्या एकूण आयातीत पेट्रोलियमचा सगळ्यांत जास्त हिस्सा (सध्या ३१%) आहे. |
| ४) | पेट्रोलियम उत्पादने ही दुसऱ्या क्रमांकाची निर्यात होणारी उत्पादने आहेत. (२०१३-१४ मध्ये २०.१%) | ४) | सोने हा दुसऱ्या क्रमांकाचा आयात होणारा घटक आहे. (२०१३-१४ मध्ये २७.५ अब्ज यू.एस.डॉलर्स) |
| ५) | अभियांत्रिकी वस्तू, पेट्रोलियम पदार्थ, रसायने आणि रासायनिक पदार्थ, रत्ने आणि दागिने व कापड आणि तयार कपडे यांची निर्यात दिवसेंदिवस वाढत आहे. | ५) | पेट्रोलियमची आयात दिवसेंदिवस वाढत आहे; मात्र सोने, खते, लोह व पोलाद यांची आयात कमी होत आहे. |

**३. व्यवहारतोल आणि व्यापारतोल (T)**

**उत्तर:**

| व्यवहारतोल | | व्यापारतोल | |
|---|---|---|---|
| १) | एका वर्षाच्या कालावधीत देशाच्या सर्व आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांची पद्धतशीरपणे केलेली नोंदणी म्हणजे व्यवहारतोल होय. | १) | विशिष्ट कालावधीत देशाच्या आयात व निर्यात मूल्यांतील फरक म्हणजे व्यापारतोल होय. |
| २) | याची व्याख्या “एका देशातील रहिवासी व जगातील उर्वरित रहिवासी यांच्यात केल्या गेलेल्या सर्व देण्याघेण्याचे लिखित विवरण” अशी केली जाते. | २) | याची व्याख्या “एखाद्या विशिष्ट काळातील, एखाद्या देशाच्या दृश्य व अदृश्य वस्तूंचे निर्यात मूल्य आणि आयात मूल्यांचे संबंध” अशी केली जाते. |
| ३) | यामध्ये वेगवेगळ्या देशांतील नागरिक, व्यापारी, उद्योगसंस्था, सरकार यांच्यात वस्तू व सेवांची जी देवाणघेवाण केली जाते त्याच्या मूल्यांचा समावेश होतो. | ३) | यामध्ये दृश्य व अदृश्य वस्तूंच्या आयात-निर्यात मूल्यांचा समावेश होतो. |
| ४) | व्यापारतोल या संकल्पनेच्या तुलनेत व्यवहारतोल व्यापक संकल्पना आहे. | ४) | व्यापारतोल हा व्यवहारतोल या संकल्पनेचा भाग आहे. |

## सराव चाचणी

**वेळ: १ तास** **एकूण गुण: २५**

**प्र.१ अ. योग्य पर्याय निवडा.** **[२]**

१. विदेशी व्यापाराच्या दिशेत याचा समावेश होतो.

i. निर्यातीचे अंतिम स्थान ii. आयातीचे स्रोत

iii. आयातीचे अंतिम स्थान iv. निर्यातीचे स्रोत

अ. i, ii आणि iii ब. i, ii, iii आणि iv

क. i आणि ii ड. ii

२. व्यवहारतोल असा असतो.

i. दिलेल्या कालावधीसाठी ii. पद्धतशीर नोंदणी

iii. आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार iv. बाजार किमतीवर आधारित

अ. i आणि iv ब. i, ii आणि iii

क. ii आणि iv ड. iii

**ब. सहसंबंध पूर्ण करा.** **[२]**

१. गृह व्यापार : अंतर्गत व्यापार :: आंतरराष्ट्रीय व्यापार : _______

२. आयातीतील सर्वांत जास्त हिस्सा : पेट्रोलियम :: निर्यातीतील सर्वांत जास्त हिस्सा : _______

**क. दिलेल्या विधानांसाठी योग्य अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सुचवा.** **[३]**

१. ज्यामध्ये वस्तूची आयात करून त्यावर प्रक्रिया करून तिची निर्यात केली जाते, असा विदेशी व्यापाराचा प्रकार.

२. विशिष्ट कालावधीतील देशाच्या आयात व निर्यात मूल्यांतील फरक.

३. एका देशातून दुसऱ्या देशात केला जाणारा वस्तूंचा बहिर्प्रवाह.

**ड. विधाने आणि तर्क विधाने-खालील पर्यायांमधील योग्य पर्याय निवडा.** **[२]**

१. विधान (अ): २०१३-१४ मध्ये सोन्याच्या आयातीमध्ये लक्षणीय घट झाली.
तर्क विधान (ब): सरकारने सोने आयातीवर अंकुश ठेवण्यासाठी विविध निर्बंध घातले.
   अ. विधान 'अ' सत्य आहे; पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
   ब. विधान 'अ' असत्य आहे; पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
   क. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
   ड. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

२. विधान (अ): आयात व्यापारात वस्तूंचा अंतःप्रवाह स्वदेशात येतो.
तर्क विधान (ब): आयात व्यापार हा अंतर्गत व्यापाराचा प्रकार आहे.
   अ. विधान 'अ' सत्य आहे; पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
   ब. विधान 'अ' असत्य आहे; पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
   क. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
   ड. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**प्र.२ खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा.** **[४]**

१. भूतानची आयात जवळपास त्यांच्या निर्यातीच्या दुप्पट आहे.

२. जपान म्यानमारला मोबाइल फोन विकतो.

**प्र.३ फरक स्पष्ट करा.** **[४]**

१. अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार

२. व्यवहारतोल व व्यापारतोल

**प्र.४ सविस्तर उत्तर लिहा.** **[८]**

१. विदेशी व्यापार म्हणजे काय सांगून विदेशी व्यापाराची भूमिका स्पष्ट करा.

Sample Content

सराव चाचणीची उत्तरे पाहण्याकरता विद्यार्थ्यांनी सोबत दिलेला **Q.R. Code** स्कॅन करावा.

## AVAILABLE NOTES FOR STD. XI & XII:

### SCIENCE

**Perfect Series:**

For students who want to excel in board exams and simultaneously study for entrance exams.


- Physics Vol. I
- Physics Vol. II
- Chemistry Vol. I
- Chemistry Vol. II
- Mathematics & Statistics Part - I
- Mathematics & Statistics Part - II
- Biology Vol. I
- Biology Vol. II


**Precise Series:**

For students who want to excel in board exams.

- Physics
- Chemistry
- Biology

**Additional Books for Std. XII Science:**




### COMMERCE

**Smart Notes:**

- Book-Keeping and Accountancy
- Book Keeping and Accountancy (Practice)
- Economics
- Organisation of Commerce and Management
- Secretarial Practice
- Mathematics and Statistics - I
- Mathematics and Statistics - II

### ARTS

- History
- Geography
- Political Science
- Psychology
- Sociology

**Languages:**

- English Yuvakbharati
- Hindi Yuvakbharati
- Marathi Yuvakbharati

Books available for MHT-CET, NEET & JEE

## OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of STATIONERY

Visit Our Website